ठाणे, शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १२४ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**झारखंडमधील भाजपाच्या हालचाली**

झारखंड मुक्ती मोर्चाचे माजी वरिष्ठ नेते आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी नुकताच भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. झारखंडची राजधानी रांची येथील शहीद मैदानात भाजपाने.....पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

| सोने | चांदी |
| --- | --- |
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



या या! तुमच्यासारख्या स्टार हिरॉईन आमच्या पक्षात आल्या आहेत तर भाग्यच उजळणार आमचं आणि जनतेचंही!



लाडक्या बाप्पाच्या आगमनाला अवघा एक आठवड्याचा काळ राहिला असून ठाणे, कळवा विभागातील पारसिक नगर परिसरामध्ये गणपती कारखान्यांमध्ये आकार घेतलेल्या गणरायाच्या मूर्तीवर कारागीर अखेरचा हात फिरवताना ....(छाया–अशोक घाग)

## देशात मान्सूनचा मुक्काम वाढला, सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये पडणार जोरदार पाऊस

**मुंबई – यंदा देशातील बहुतांश भागात चांगला पाऊस झाला आहे. काही ठिकाणी जनजवीन विस्कळीत देखील झालं आहे. चांगल्या पावसामुळं नदी नाले धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळत आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, 'ला' निनाच्या प्रभावामुळं यावर्षी मान्सूनचा मुक्काम वाढणार आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.**

### 'ला' निनामुळे कमी दाबाचा पट्टा, त्यामुळं जोरदार पावसाची शक्यता

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनचा परतीचा प्रवास सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत लांबण्याची चिन्हे दिसत आहेत. ला निनामुळं कमी दाबाचा पट्टा तयार होणार आहे, त्यामुळं सप्टेंबर महिन्यात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतात जून महिन्यात मान्सूनचे आगमन होते आणि सप्टेंबर महिन्यात मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु होतो. ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत संपूर्ण भारतातून मान्सून परततो. देशातील जवळफास निम्मी शेतजमीन ही जून ते सप्टेंबर या कालावधीत पडणाऱ्या पावसावर अवलंबून आहे.

### पावसामुळं पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार

सप्टेंबरमध्ये होणाऱ्या पावसामुळं सोयाबीन, मका, कापूस यासारख्या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार आहे. तर जमिनीत ओलावा राहून खरीप हंगामातील गहू, हरभरा या पिकांना त्याचा फायदा होऊ शकतो. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. सरासरीपेक्षा देशात आत्तापर्यंत ७ टक्के पाऊस अधिक झाला आहे.

# मी शिवरायांच्या चरणांवर डोकं ठेवून माफी मागतो, माझे संस्कार वेगळे आहेत - पीएम मोदी

**मुंबई –पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराच्या भूमिपूजनासाठी महाराष्ट्रामध्ये आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा कोसळल्याने मी शिवरायांच्या चरणावर डोकं ठेवून माफी मागतो, अशा शब्दांमध्ये प्रतिक्रिया दिली. पीएम मोदी यांनी शिवभक्तांची सूद्धा माफी मागितली. माझे संस्कार वेगळे आहेत असे म्हणत माफी मागत असल्याचे ते म्हणाले. सावरकरांचा अपमान करूनही माफी मागत नसलेल्यांपैकी मी नाही. माझे संस्कार वेगळे आहेत, असेही पीएम मोदी म्हणाले. शिवरायांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण मोदींच्याच हस्ते गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात करण्यात आले होते. मात्र, हाच पुतळा कोसळल्याने राज्यात संतप्त असून हा महाराजांचा अपमान असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. त्यामुळे मोदी राज्यात आल्याने कोणती प्रतिक्रिया देणार याकडे लक्ष होते. मात्र, त्यांनी थेट माफीनामा देत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.**

**वाढवण बंदराचा पायाभरणी व १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ**




### शिवाजी महाराज आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत

पीएम मोदी म्हणाले की, मला पंतप्रधानपदाचा उमेदवार निश्चित केल्यानंतर मी रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीसमोर जाऊन प्रार्थना केली होती. एक भक्त आपल्या आराध्य दैवताची प्रार्थन करतो, तशी मी राष्ट्रसेवेच्या यात्रेला प्रारंभ केला होता. काही दिवसांपूर्वी सिंधुदुर्गात जे काही घडलं ते माझ्यासाठी आणि माझ्या सहकाऱ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज फक्त एक नाव नाही, फक्त एक राजा नाही, तर शिवाजी महाराज आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. आज मी मस्तक झुकवून मी माझं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची त्यांच्या पायावर मस्तक ठेवून माफी मागतो.



**वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचे आर्थिक चित्र बदलणार – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** ....पान २वर/

**थोडक्यात घडामोडी**



### राजकोट किल्ला पुतळा प्रकरणी चेतन पाटील पोलिसांच्या ताब्यात

सिंधुदुर्गमधील पुतळ्याप्रकरणी स्ट्रक्चरल कन्सल्टन्ट आरोपी चेतन पाटीलवर गुन्हा दाखल करण्यात आलेला. त्यानंतर चेतन पाटीलच्या कोल्हापुरातील शिवाजी पेठ इथल्या घरी जात पोलिसांनी चौकशी देखील केली होती. अशातच आता चेनत पाटीलला कोल्हापूर पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून ही कारवाई करण्यात आली आहे. मध्यरात्री तीन वाजता चेतन पाटीलला ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे.

याप्रकरणातील अन्य आरोपी जयदीप आपटे हादेखील सध्या फरार आहे. जयदीप आपटे हा कल्याणमध्ये वास्तव्याला आहे. मात्र, पोलिसांचे पथक त्याच्या घरी गेले होते, त्यावेळी त्याच्या घराला टाळे होते. यानंतर पोलिसांनी माहेरी गेलेल्या जयदीप आपटे याच्या पत्नीची चौकशी केली. दरम्यान, संभाजी ब्रिगेडने गुरुवारी जयदीप आपटेच्या घराबाहेर निदर्शन केली. त्यामुळे आता पोलीस जयदीप आपटेला कधी पकडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

चेतन पाटील याला आता मालवण पोलीस ठाण्यात आणले जाणार असून त्याची कसून चौकशी केली जाईल. या चौकशीतून शिवाजी महाराजांच्या पुतळ्याविषयी आणखी कोणती नवी माहिती समोर येणार, हे पाहावे लागेल. चेतन पाटील हा स्ट्रक्चरल कन्सल्टंट असून त्याच्या दाव्यानुसार पुतळ्यासाठी जे फाऊंडेशन (चबुतरा) उभारला होता, त्याचे डिझाईन त्याने नौदलाला तयार करुन देण्यात आले होते. यापलीकडे त्याला नौदलाकडून कोणतीही वर्क ऑर्डर किंवा पत्र प्राप्त झाले नसल्याचे चेतन पाटील याने अगोदरच स्पष्ट केले होते.

## 'त्या' चौदा गावांसाठी एक रुपयाही खर्च नको, आयुक्तांसमवेतच्या बैठकीत गणेश नाईक आक्रमक

**नवी मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खासदार पुत्र डॉ. श्रीकांत यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघात मोडत असलेल्या १४ गावांच्या नवी मुंबई महापालिका हद्दीतील समावेशास आपला विरोध असल्याची स्पष्ट भूमिका ऐरोलीतील भाजप आमदार गणेश नाईक यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मांडल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या नगरविकास विभागाने गेल्या आठवड्यात काढलेल्या एका आदेशानुसार या गावांच्या नियोजनाचे संपूर्ण अधिकार नवी मुंबई महापालिकेकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांची भेट घेत या गावांमध्ये एक रुपयाचाही खर्च केला तर याद राखा, असा इशारा नाईकांनी दिल्याचे समजते. विशेष म्हणजे,



'माझी ही भूमिका तुमच्या मुख्यमंत्र्यांना कळवा', अशा शब्दांत नाईकांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दरडावल्याने १४ गावांच्या समावेशावरून नाईक-मुख्यमंत्री पुन्हा एकदा आमने-सामने आल्याचे चित्र आहे.

नवी मुंबई महापालिकेतून वगळलेल्या ठाणे-कल्याणच्या वेशीवरील १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत पुन्हा समावेश करण्याचा निर्णय राज्य सरकारने मार्च २०२४ मध्ये घेतला. एकेकाळी वाढीव मालमत्ताकराच्या प्रश्नावर नवी मुंबई महापालिकेतून **(पान २ वर)**

### माझा निरोप मुख्यमंत्र्यांना पोहचवा

या बैठकीत गणेश नाईक आक्रमक झाल्याचे उपस्थित सूत्रांनी सांगितले. '१४ गावांसंबंधी माझी भूमिका तुमच्या मुख्यमंत्र्यांना कळवा' या शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावल्याचे समजते. 'याविषयी माझी भूमिका स्पष्ट आहे, मी कुणाला घाबरत नाही', असेही ते म्हणाल्याचे समजते.

### राजकीय संघर्ष पेटण्याची चिन्हे

या पार्श्वभूमीवर गणेश नाईक यांनी महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत घेतलेल्या एका बैठकीत या गावांमध्ये एक रुपयाही खर्च होता कामा नये, अशी स्पष्ट भूमिका घेतल्याने या मुद्द्यावरून नवा राजकीय संघर्ष पेटण्याची चिन्हे आहेत




मालवण येथील राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना नुकतीच घडली आहे. या घटनेचा निषेध करण्याकरिता मराठा क्रांति मोर्चा व सकल मराठा समाज, ठाणे यांच्यावतीने ठाण्यात आंदोलन करण्यात आले. यावेळी तलावपाळी येथील छत्रपती शिवाजी महाराजांचे दुग्धाभिषेक करण्यात आला, या आंदोलनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पडझड होण्यामागे जबाबदार असलेल्या सर्व संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. याप्रसंगी रमेश आंब्रे, महेश कदम, कृष्णा पाटील, मंगेश आवळे, दिनेश पवार, प्रशांत कदम, रमेश चौधरी, गीता चव्हाण, जयंत जगताप, पतंगराव, संतोष सूर्यराव असे मराठा समाजाचे अनेक कार्यकर्ते सहभागी होते. (छाया – मनोज सिंह)

## महिलांसाठी जनकल्याण स्मार्ट कार्ड : १ सप्टेंबरपासून पाडणार सवलतींचा पाऊस

ठाणे – सरकारच्या विविध शासकिय योजनांमधून महिलांच्या उद्धाराचे कार्य होत असताना ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने महिला विकास परिवार या सामाजिक संस्थेच्या वतीने महिलांना जनकल्याण स्मार्ट कार्ड देण्यात येणार आहे. महिलांना संसाराचा गाडा हाकण्यासाठी या मोफत जनकल्याण डिस्काऊंट कार्डचा हातभार लागणार आहे.

रविवार दि. १ तारखेला, नौपाडा येथील भगवती शाळेच्या मैदानात, सायंकाळी ५ वा. या कार्ड चे वाटप आ. केळकर यांच्या हस्ते होणार आहे.

शुक्रवारी शासकिय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार संजय केळकर यांनी ही माहिती दिली.

### कोणत्या दुकानातून मिळणार सूट

या आस्थापनांच्या यादीत साड्यांची नऊ, ड्रेस मटेरियल १८, मेन्स वेअर १२, किड्स वेअर तीन, स्टील व क्रॉकरी नऊ, ज्वेलरी घडणावळ आठ कॉस्मेटिक इमिटेशन सहा, फुटवेअर तीन, मोबाईल, आयटी स्टेशनरी तीन, पर्सेस-बॅग्स तीन, फर्निचर तीन, खेळणी युनिफॉर्म आणि मेडीकल स्टोअर प्रत्येकी एक अशा ८०हून अधिक दुकानांचा समावेश आहे. ठाणे शहरातील सर्व घटकातील गरजू महिलांना हे कार्ड वर्षभर वापरता येणार आहे तसेच त्याचे नंतर नूतनीकरणही करता येणार आहे.



**आ.संजय केळकर यांची महिला भगिनींसाठी अनोखी भेट**

**महिला विकास परिवार संस्थेचे संयोजन**

जनसेवक आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने ठाणे शहरातील सर्व महिला भगिनी सदस्यांना देण्यात येणाऱ्या या जनकल्याण कार्डच्या माध्यमातून महिला भगिनी स्वत:साठी किंवा आपल्या कुटुंबासाठी दिलेल्या दुकानांच्या यादीमधून ज्या दुकानात खरेदी करतील तिथे त्यांना १५ ते ५० टक्क्यांपर्यंत विशेष सूट मिळणार आहे. याबाबत बोलताना आमदार संजय केळकर म्हणाले, मतांसाठी प्रासंगिक नाही तर सुरक्षा, सुविधा, सेवा आणि स्वयंरोजगार या चतु:सुत्रीवर मी वर्षभर महिला भगिनींच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून मुलींना ऑनलाइन शिक्षणासाठी मोफत क्लाउड ॲप उपलब्ध **(पान २ वर)**

## पनवेलमध्ये सावित्रीच्या लेकींचा पुरस्काराने सन्मान

**पनवेल (प्रतिनिधी) – सामाजिक, शैक्षणिक, कला, संस्कृती, क्रीडा अशा विविध क्षेत्रात गेली अनेक वर्ष उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि दैनिक लोकमत वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल परिसरातील विविध क्षेत्रांमधील कर्तृत्ववान महिलांचा शुक्रवारी (दि. ३०) आम्ही सावित्रीच्या लेकी २०२४ पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या सोहळ्यात कर्तृत्ववान महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**




या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, दै. लोकमतचे उपाध्यक्ष निनाद देसाई, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, महापालिकेचे उपायुक्त कैलास गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सन १९९६पासून विविध क्षेत्रात कार्यरत असल्याचे सांगितले. सावित्रीबाई नसत्या, तर महात्मा फुलेंचे कार्य समोर आले नसते. त्यामुळे सावित्रीबाई फुलेंचे कार्य किती मोठे आहे याची अनुभूती येते. महिलांच्या सन्मानासाठी आम्ही नेहमीच पुढे आहोत. यापुढेही असेच पुढे राहू, असे अभिवचनही त्यांनी दिले. दै. लोकमतने रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळासोबत राबवलेल्या या सोहळ्याचे मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर **(पान २ वर)**

**यांचा झाला सन्मान :** डॉ. प्रज्ञा डोंगरगावकर, डॉ. रजनी मुल्लरपटण, डॉ. प्रभा दसीला, मनिषा बंड, डॉ. मानसी ठाकूर (वैद्यकीय शैक्षणिक विभाग), डॉ. जयश्री पी. पाटील, डॉ. शोभना पालेकर, कीर्ती समुद्रा, डॉ. शुभदा नील (वैद्यकीय विभाग), डॉ. निवेदिता श्रेयांस, डॉ. सीमा एन. कांबळे, वैशाली जगदाळे, ज्योत्स्ना भरडा, ओपन स्काय अकॅडमी, अनुष्का कोठेकर, राज अलोनी, डॉ. प्रणती टिळक (शैक्षणिक विभाग), प्रिया रातांबे, वर्षा कुलकर्णी (प्रशासन विभाग), कल्पना कोठारी, सिंधू नायर (मनोरंजन आणि सामाजिक सेवा विभाग), डॉ. सुप्रिया वाकचौरे (वैद्यकीय आणि सामाजिक सेवा विभाग), अपर्णा एस. कांबळे (पत्रकारिता शैक्षणिक विभाग), आस्मा सय्यद, वैशाली ठाकूर, तेजी घोष (व्यवसाय विभाग), डॉ. अश्विनी आर्ते (व्यवस्थापन शिक्षण प्रशासन विभाग), सीमा त्रिवेदी (व्यवसाय आणि साहित्यिक विभाग), ॲड. शिल्पा नागावकर (कायदेशीर शैक्षणिक सामाजिक सेवा विभाग), सायली सरक, मानसी पाटील (सामाजिक सेवा विभाग), सुषमा पोतदार (पाककला विभाग), रूपाली लांडगे (मायदेशी प्रशैक्षणिक विभाग), गीता गुप्ता (योगशिक्षिका विभाग), कल्पना म्हात्रे (जनशैक्षणिक विभाग), ऐश्वर्या महाडिक, स्वस्तिका घोष, स्नेहल पाटील (क्रीडा विभाग), हेमाली शेडगे (सांस्कृतिक विभाग), मोहिनी पांढरे (समाजसेवा-सनातन संस्था विभाग), वंदना पवार (समाजसेवा विभाग), विजया बाबर (मनोरंजन विभाग).

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## झारखंडमधील भाजपाच्या हालचाली

झारखंड मुक्ती मोर्चाचे माजी वरिष्ठ नेते आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी नुकताच भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. झारखंडची राजधानी रांची येथील शहीद मैदानात भाजपाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान व आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या प्रमुख उपस्थितीत चंपाई सोरेन यांनी भाजपात प्रवेश केला. या कार्यक्रमाला झारखंड भाजपाचे संघटन प्रभारी लक्ष्मीकांत वाजपाई, भाजपा प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी, माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा यांच्यासह पक्षातील अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. चंपाई सोरेन यांच्या भाजपा प्रवेशाने झारखंड येथील राजकीय समीकरणे बदलणार आहेत.

पक्षप्रवेशानंतर चंपाई सोरेन यांनी त्यांच्या आगामी योजनेवर भाष्य केले आहे. पक्षप्रवेश सोहळ्यानंतर सोरेन यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी आगामी योजनेबाबत विचारले. तेव्हा ते म्हणाले, मी आधीच म्हटले आहे की आमचे संपूर्ण लक्ष झारखंडच्या विकासावर असेल. राज्यात बांगलादेशी लोकांची होणारी घुसखोरी आम्ही निश्चितपणे थोबवणार आहोत. सोरेन यांना पक्षाप्रवेशाबाबत विचारण्यात आले की, भाजपामध्ये तुम्हाला कोणती जबाबदारी दिली जाणार आहे? त्यावर सोरेन यांनी म्हटले आहे की, तो निर्णय पक्ष घेईल. पक्ष मला जी जबाबदारी सोपवेल ते काम मी ईमानदारीने करेन.

चंपाई सोरेन यांनी काही दिवसांपूर्वी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत झारखंड मुक्ती मोर्चा या त्यांच्या पूर्वीच्या पक्षावर नाराजी व्यक्त होती. आपल्याला अपमानास्पद पद्धतीने मुख्यमंत्री पदावरून काढल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले होते की, सत्ता मिळाल्यावर बाबा तिलका मांझी, भगवान बिरसा मुंडा आणि सिदो–कान्हू यांसारख्या वीरांना आदरांजली अर्पण करून मी राज्याची सेवा करण्याचा संकल्प केला होता. मी कधीही कोणावरही अन्याय केला नाही किंवा होऊसुद्धा दिला नाही. हूलच्या दुसऱ्या दिवशी माझे पुढील दोन दिवसांचे सर्व कार्यक्रम पक्षनेतृत्वाने पुढे ढकलले. यापैकी एक कार्यक्रम दुमका येथे, तर दुसरा पीजीटी शिक्षकांना नियुक्ती पत्र वाटपाचा होता. याबाबत मी पक्षातील लोकांना विचारल्यावर त्यांनी मला सांगितले की, ३ जुलै रोजी विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे, तोवर तुम्ही मुख्यमंत्री म्हणून कोणत्याही कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नसल्याचे सांगण्यात आले.

चंपाई सोरेन यांनी पूर्वीच्या पक्षातील अनुभव कथन करताना म्हटले की, मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रम दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने रद्द करण्यापेक्षा लोकशाहीत दुसरा कुठला मोठा अपमान असू शकतो. या अपमानास्पद वागणुकीमुळे मी माझ्या अश्रूंवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत होतो. ज्या पक्षासाठी मी माझे संपूर्ण आयुष्य समर्पित केले, त्याच पक्षात माझे काय अस्तित्व आहे असा मला प्रश्न पडला. पक्षाने माझा इतका अपमान केल्यानंतर आणि मी तो सहन केल्यानंतर मला पर्यायी मार्ग शोधणे भाग पडले.

झारखंड मुक्ती मोर्चातून भाजपामध्ये प्रवेश केलेले चंपाई सोरेन आता झारखंडचे राजकीय गणित बदलण्यासाठी सज्ज झाले आहेत. पूर्वीच्या पक्षाने त्यांचा अपमान केल्याचे सोरेन यांनी म्हटले आहे. भाजपाला ही योग्य वेळ वाटली असावी. भाजपा छोट्या राज्यांतील राजकारणावर लक्ष ठेवून असतो. त्यामुळेच जिथे अशी संधी मिळते, तिथे भाजपा पक्षाला अनुकूल राजकीय हालचाली करून आपले बस्तान बसवतो असा इतिहास आहे.

## वाढवण बंदराचा पायाभरणी व १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ

# वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचे आर्थिक चित्र बदलणार – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**(पान १ वरून)** पालघर – देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासात मच्छिमार बांधवांचे मोठे योगदान आहे. वाढवण बंदर हा जगातील सर्वात खोल व मोठ्या बंदरांपैकी एक महत्त्वपूर्ण बंदर होणार आहे. या प्रकल्पामुळे या परिसराचे आर्थिक चित्र बदलणार आहे. आता हा परिसर रेल्वे व महामार्गांशीही जोडला जाणार असून यामुळे या परिसरात नवनवीन व्यापार सुरू होतील. या बंदराचा लाभ महाराष्ट्राबरोबरच या भागातील स्थानिकांना व त्यांच्या पुढील पिढ्यांना होणार आहे, असे प्रतिपादन देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

सुमारे ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ तसेच १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पाचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पालघरमधील सिडको मैदानात आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय बंदर विकास, जहाज व जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन राज्यमंत्री जॉर्ज कुरियन, केंद्रीय बंदर विकास, जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, बंदर विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार श्रीनिवास वनगा, आमदार निरंजन डावखरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेश वाघ, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे आदी यावेळी उपस्थित होते.




यावेळी प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते स्थानिक मच्छिमार, शेतकऱ्यांना ट्रान्सपॉड व किसान क्रेडिट कार्डचे वाटप करण्यात आले.




### जेएनपीटीपेक्षा तिप्पट मोठं बंदर इथं होतंय – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

शुक्रवारी ३० ऑगस्ट रोजी पालघर येथील वाढवणं बंदराचं भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी वाढवण बंदरासाठी पुढाकार घेतल्याबद्दल मोदींचे आभार मानले. फडणवीस भाषणादरम्यान म्हणाले की, जेएनपीटीपेक्षा तिप्पट मोठे बंदर इथं होणार आहे. यामुळे महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर कायम राहील. बंदर होणार नाही असं सर्वांना वाटत होतं मात्र मोदीजींच्या प्रयत्नातून हे बंदर होतंय. तसेच या बंदराला राष्ट्रीय बंदराचा दर्जा दिला जाणार आहे, या वाढवण बंदरामुळे पंतप्रधान मोदी यांचे नाव इतिहासात नोंद होईल. या परिसरात एअरपोर्टही व्हावे यासाठी सुद्धा आम्ही प्रयत्नशील आहोत. तसेच मच्छिमारांसाठी विविध सोयी उपलब्ध करू. मच्छिमार,आदिवासींना ट्रेनिंग देवून इथं काम दिले जाईल असं आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी भाषणा दरम्यान दिलं.




### वाढवण बंदरामुळे मच्छिमारांना आर्थिक बळ मिळेल

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पालघर जिल्ह्यातील एकाही बांधवावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेत आहोत. त्यांच्या पुढच्या पिढ्यांना देखील मदत होईल अशी भूमिका राज्य शासन घेत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने देशात भौतिक, सामाजिक आणि आर्थिक विकास झपाट्याने होत आहे. वाढवण बंदराचा फायदा महाराष्ट्राला होणारच आहे, त्याचबरोबर संपूर्ण देशालाही या बंदराचा फायदा होईल. केंद्र शासनामार्फत मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी मोठमोठे महत्त्वकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे मच्छीमारांना आर्थिक बळ मिळेल आणि त्यांचा सामाजिक आणि आर्थिक विकास होईल.




### वाढवण बंदर हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे शिखर ठरणार

पालघर – महाराष्ट्रासह देशाच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोलाचा ठरणाऱ्या वाढवण बंदराचे भूमिपुजन आज होत आहे. वाढवण बंदर हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे शिखर ठरणार आहे. या बंदरामुळे जगातील पहिल्या दहा कंटेनर पोर्टच्या यादीत भारताचे नाव समाविष्ट होणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासाला चालना मिळणार असून सुमारे १२ लाखापेक्षा जास्त युवकांना रोजगार मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पालघर येथे केले.

### वाढवण बंदराला स्थानिक, मच्छिमारांचा विरोध

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाढवण बंदराचा भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे. पालघरच्या सिडको मैदानात हा सोहळा होणार आहे. या बंदराला स्थानिक मच्छिमारांनी विरोध केला आहे. याच पार्श्वभूमीवर आज स्थानिक भूमिपुत्र आणि मच्छीमारांकडून बोटीमध्ये काळे फुगे लावण्यात आले आहे. तसेच काही बोटींवर काळे झेंडेही पाहायला मिळत आहे. डहाणू खाडी असलेल्या अनेक मच्छीमारांनी या बंदराचा निषेध केला आहे. विशेष म्हणजे या बंदराला राज्यातील सर्व मच्छिमारांकडून विरोध केला जात आहे. यामुळे राज्यातील सर्व कोळीवाड्यातून दिवसभर विरोध दर्शविण्यात येणार आहेत. पालघरमधीव वाढवण बंदराला स्थानिक भूमिपुत्रांचा तीव्र विरोध असूनही पंतप्रधान याचे भूमिपूजन करत आहेत, ही हुकूमशाही आहे. कोणत्याही परिस्थितीत आम्ही हे वाढवण बंदर होऊ देणार नाही. पंतप्रधान भूमिपूजन करतील, त्याच वेळी आम्ही निदर्शने करून याचा तीव्र निषेध व्यक्त करु, अशी प्रतिक्रिया डहाणूचे आमदार विनोद निकोले यांनी केली.

## त्या चौदा गावांसाठी एक रुपयाही खर्च नको, आयुक्तांसमवेतच्या बैठकीत गणेश नाईक आक्रमक

**(पान १ वरून)** बाहेर पडल्याने ही गावे समस्यांच्या गर्तेत सापडली होती. यातून बोध घेऊन या गावातील ग्रामस्थांनी आमच्या गावांचा पुन्हा नवी मुंबई महापालिकेत समावेश करावा अशी मागणी लावून धरली होती. ती लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी महायुती सरकारने शासन निर्णय काढून पूर्ण केली. या निर्णयामागे कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा आग्रह महत्त्वाचा ठरला. ही १४ गावे डॉ. श्रीकांत यांच्या मतदारसंघात येत असल्याने निवडणुकांच्या तोंडावर हा निर्णय व्हावा यासाठी ते कमालीचे आग्रही होते.

मुलाचा आग्रह आणि स्थानिक मतांचे गणित लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनीही हा निर्णय तातडीने घेतला. या निर्णयाचा मोठा फायदा निवडणुकीत डॉ. श्रीकांत यांना मिळाला. ही १४ गावे आणि काही अंतरावरील २७ गावांमधून डॉ. श्रीकांत यांना मोठे मताधिक्य मिळाले. काही दिवसांपूर्वी राज्याच्या नगरविकास विभागाने या १४ गावांच्या नियोजनाचे अधिकारही महापालिकेकडे सोपविले.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून हे अधिकार काढून घेताना महापालिकेस हे अधिकार दिले गेल्याने या ठिकाणी बांधकाम परवानग्या देणे, विकास आराखडा तयार करण्याची महत्त्वाची कामे आता महापालिकेस करता येणार आहेत. असे असताना नवी मुंबईतील भाजप नेते गणेश नाईक यांनी या गावांतील विकासकामे आणि सरकारच्या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याने नाईक–मुख्यमंत्र्यांमधील विसंवाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

'राज्य सरकारला इतकेच वाटत असेल तर एमएमआरडीए अथवा इतर प्राधिकरणाने या गावामधील पायाभूत सुविधांचा खर्च करावा. या सुविधांवर होणारा शेकडो कोटी रुपयांच्या खर्चाचा भार नवी मुंबई महापालिकेवर कशासाठी?', असा सवालही नाईक यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत केल्याचे समजते.

चौदा गावांच्या समावेशामुळे नवी मुंबई महापालिकेच्या तिजोरीवर मोठा भार पडणार आहे. भौगोलिकदृष्ट्याही या गावांचा नवी मुंबईशी फारसा संबंध नाही. या गावांमधील राजकीय व्यवस्था लक्षात घेता नाईकांच्या नवी मुंबईतील सत्तेला यामुळे आव्हान उभे राहू शकते, असे चित्र आहे. शिवाय या गावांचे क्षेत्र कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रात येत असल्याने महापालिकेची हद्द आता ऐरोली–बेलापूरसह कल्याण ग्रामीण अशा तीन आमदारांच्या क्षेत्रात विभागली जाणार आहे.

## महिलांसाठी जनकल्याण स्मार्ट कार्ड : १ सप्टेंबरपासून पाडणार...

**(पान १ वरून)** करून देण्यात आले आहे. त्याचा लाभ सुमारे अडीच हजार मुलींनी घेतला आहे. १०० गरीब–गरजू मुलींना मोफत अँड्रॉइड मोबाईल देण्यात आले. ७५० मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. दीड हजार मुलींना कॉम्प्युटर प्रशिक्षण देण्यात आले. स्वयं रोजगारासाठी दरवर्षी दिवाळी सणात महिला बचतगटाच्या २००–२५० महिलांना स्टॉलच्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळत असते. बचतगटाच्या २५ महिला चपाती–भाकरीची ऑनलाईन विक्री करतात. उत्तम पॅकिंग आणि गुणवत्ता असलेले हे अन्न पदार्थ घरपोच दिले जातात. यातून महिलांचे सक्षमीकरण होत आहे. सिव्हिल रुग्णालयात बाळंत महिलांना बाळंत विडा म्हणून आवश्यक साहित्याचे किट देण्यात येत आहे. हे उपक्रम वर्षभर राबवले जात असल्याची माहिती श्री. केळकर यांनी दिली. पत्रकार परिषदेस आमदार संजय केळकर यांच्यासह महिला विकास परिवाराचे संयोजक पंढरीनाथ पवार, व्यापारी आघाडीचे ठाणे शहर अध्यक्ष मितेश शाह आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये सावित्रीच्या लेकींचा पुरस्काराने सन्मान

**(पान १ वरून)** यांनी कौतुक केले. देशात प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला आपले कर्तृत्व गाजवत आहेत. आज देशाचे सर्वोच्च समजले जाणारे राष्ट्रपतीपद द्रौपदी मुर्मू सांभाळत आहेत. यातून महिलांचे कर्तृत्व सिद्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या सोहळ्यादरम्यान गणेश वंदना आणि ओडिसी नृत्य सादर झाले. 'पाहिले न मी तुला' या नाटकाच्या कलाकारांनी आपल्या नाटकाची तोंडओळखही उपस्थितांना करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन घाणेकर यांनी केले.


### हैतुक दर्शित करने के लिए सूचना

(साधारण प्रारूप)

**व्यवहार प्रक्रिया संहिता पहली अनुसूची संख्याक ४**

न्यायालय पारिवारिक न्यायालय क्रम संख्या–५, जयपुर महानगर जयपुर ।

क्षितिज चौधरी विरूद्ध अक्षिता घोटिया

प्रार्थना पत्र धारा १३ (१) हिन्दू विवाह अधिनियम

प्रार्थना पत्र संख्या ७१ / २०२२ CASE NO. ३६६९/२३

नाम अक्षिता घोटिया पुत्री श्री विरेन्द्र घोटिया, जाति–जाट, पता– बी–१०३, रिवेरा सिद्धेश्वर गार्डन, कोलशिट रोड, धोकली, थाना ठाणे, मुम्बई, महाराष्ट्र – ४००६०७

उक्त प्राथीं / याचिकाकर्ता ने इस न्यायालय में यह आवेदन किया है कि

धारा १३ (१) हिन्दू विवाह अधिनियम

अतः आपको चेतावनी दी जाती है कि आप उस आवेदन के विरूद्ध हैतुक दर्शित करने के लिए दि. १७ माह १० सन् २०२४ को दिन में १०.३० ए.एम. पूर्वान्ह में स्वयां या अपने प्लीडर द्वारा जिसे सम्यक रूप से अनुदेष किया गया हो, उपसंजात हो। यदि आप ऐसा करने में असफल रहेगें तो उक्त आदेष की सुनवाई और उसका निपटारा एक पक्षीय रूप से किया जाएगा।
यह आज ता. **३०** माह **०८.** सन **२०२४** को मेरे हस्ताक्षर से और न्यायालय की मुद्रा लगाकर दी गई।

कोर्ट स्टॅम्प

सही/–
वरिष्ठ मुंसरिम
पारिवारिक न्यायालय क्रम–५
जयपुर महानगर प्रथम
न्यायालय



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे
पत्ता– ३ ते ६ मजला, वेस्ट व्ह्यू बिल्डींग,
गजानन महाराज मंदिरा जवळ,
राम मारुती रोड, ठाणे (प.) ४०० ६०२
दिनांक : २९.०७.२०२४

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक : ACC II / 983 / 2024
सार्वजनिक न्यासाचे नाव : BOSCO EDUCATION TRUST®, DOMBIVLI E-1342/THANE
अर्जदार श्री./श्रीमती : MR. RAHUL SHANKAR BOSE

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त –२, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी **महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम २२ प्रमाणे** चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे की,
खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये/विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आले आहे.
१). Mrs. Bithika Partho Ghosh - Trustee

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वर नमूद पत्त्यावर प्राप्त होईल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्यानिशी आज दिनांक २९–०७–२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/–
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/13126/18/24
Inquiry/case No. : ACC/I/905/2024
Name of the Trust : ज्ञानयोग एज्युकेशन ट्रस्ट
**Address of the Trust : आर. एच. नं. ५, प्लाट नं. ३३, सेक्टर –१७, जय तुळजा भवाणी, कोपरखैरणे, नवी मुंबई, (पूर्व), ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : सौ. पल्लवी सचिन डुकरे**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 21/08/2024
.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. ०२२–२७४५२२३३ Email: panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.४००/४०१/२०२४ दिनांक :– ३०/०८/२०२४

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जनत अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष/सचिव, भुमी टॉवर को–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं. ३५+३६ आणि ३६+३६ ए, सेक्टर – ३६, कामोठे. | ०२ चाफा व १३ पाम अशा एकूण १५ झाडे पुनर्रोपण/तोडण | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भुमी टॉवर को– ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं. ३५+३६, आणि ३६+३६ ए, सेक्टर – ३६, कामोठे या सोसायटीच्या इमारतीच्या बांधकामाचे नुकसान होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची / पुनर्रोपण परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस / पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२४/प्र. क्र. ४७/६२४/२०२४
दिनांक :– ३०/०८/२०२४

सही/–
(स्वरूप खारगे)
सहा.आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका



### मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे – ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२–२८१९२८२८
बांधकाम / विद्युत विभाग

जा.क्र. मनपा/साबां/निविदा/५४/२०२४–२५ दि. २९/०८/२०२४

**// निविदा सुचना क्र. ५४ //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम / विद्युत विभागाकडील ०४ विकास कामे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरूध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरू आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व निविदा पप्रत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. ०२/०९/२०२४ ते दि. १०/०९/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि. ११/०९/२०२४ रोजी पर्यंत दु. १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. १२/०९/२०२४ रोजी दु. १२.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघण्यात येतील.

जा. क्र. मनपा/ मावज/ई२७१२०७७/२४–२५
दि. ३०/०८/२०२४

सही/–
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

ठिकाण : भाईंदर
दिनांक : २९/०८/२०२४

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे


## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार – २ नायब सुभेदार –

■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.

■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण पद क्र.२: १०वी उत्तीर्ण

■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.

■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011

■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

# जिल्ह्यात मलेरिया, डेंग्युची साथ; अतिसार, स्वाईन फ्लु आणि लेप्टोचे रुग्ण

ठाणे : यंदाच्या पावसाळ्यात म्हणजेच गेल्या दोन महिन्यांत ठाणे जिल्ह्यात मलेरिया आणि डेंग्यु अशा आजारांची साथ पसरली असून गेल्या दोन महिन्यात मलेरियाचे ६५३ तर, डेंग्युचे ५०५ रुग्ण आढळून आलेले आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्युसोबतच अतिसाराचे १०६, स्वाईन फ्लु २७ आणि लेप्टो ६ रुग्ण आढळून आलेले आहेत. यामुळे जिल्ह्यात साथीच्या आजारांनी डोके वर काढल्याचे चित्र आहे.

पावसाळ्याच्या काळात मलेरिया, अतिसार, डेंग्यु, स्वाईन फ्लू, लेप्टो असे साथीचे आजार डोके वर काढतात. या आजारांची साथ पसरू नये म्हणून आरोग्य विभागाकडून विविध उपाययोजना करण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून महापालिका तसेच जिल्हा प्रशासनाकडून जनजागृती अभियान राबविण्यात येते. यामध्ये भिती पत्रकाद्वारे साथीचे आजार रोखण्यासाठी काय काळजी घ्यावी, याविषयी जनजागृती करण्यात येते. त्याचबरोबर शहरात धूर आणि औषध फवारणी करण्यात येते. घरोघरी साठवणूक ठेवलेल्या पाण्याची तपासणी करण्यात येते. त्यात डासांच्या आळ्या आढळून आल्यास त्या नष्ट करण्यात येतात. यंदाही अशा उपाययोजना राबविण्यात आल्या असल्या तरी जिल्ह्यात साथीच्या आजारांनी डोके वर काढल्याचे चित्र दिसून येत आहे.

ठाणे जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यात २ लाख ६ हजार २८८ रुग्णांची रक्त तपासणी करण्यात आली. यामध्ये ६५३ रुग्णांना मलेरिया झाल्याचे तपासणीत समोर आले. यातील जुलै महिन्यात २८४ तर, ऑगस्ट महिन्यात ३६९ रुग्ण आढळून आलेले आहेत.

## भारतीय रेल्वे

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)

■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र

■ फी : फी नाही.

■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/




■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)

■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-

■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४

■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.

■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

## भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा

■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे

■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: दिल्ली

■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४

■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.

■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

## केंद्रीय लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव :
१ डेप्युटी सुपरिटेंडिंग आर्कियोलॉजिस्ट ६७
२ केबिन सेफ्टी इंस्पेक्टर १५

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) पदव्युत्तर पदवी (Archaeology/Indian History/-nthropology) (ii) PG डिप्लोमा/ एडवांस डिप्लोमा (Archaeology) किंवा ०३ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) केबिन क्रू म्हणून दहा वर्षांचा अनुभव आणि सध्या केबिन क्रू म्हणून कार्यरत.

■ वयाची अट: ०५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० वर्षांपर्यंत

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: General/OBC/EWS: २५/- SC/ST/PH/महिला: फी नाही

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM²)

■ अधिकृत वेबसाईट https://upsc.gov.in/

## उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६

■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI

■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे

■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही

■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)

■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र

■ फी : फी नाही.

■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

# मुख्यमंत्री योजनादूत

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना राबविण्यास दि. ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिध्दी करणे व त्यांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ पोहचविण्यासाठी ५० हजार योजनादूत नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. योजनादूत कार्यक्रमाच्या अंमलबजावणी बाबतची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावर सोपविण्यात आली आहे. नेमणूक केलेल्या योजनादूतांचे मानधन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून देण्यात येणार आहे. तसेच योजनादूतांच्या निवडीचे निकष, अटी व शर्ती तयार करण्याबाबतची कार्यवाही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिध्दी करणे व त्यांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने त्यांना सहाय्य करण्यासाठी ५० हजार योजनादूत निवडण्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम सुरु करण्यास शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे. याबाबतची कार्यपध्दती पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे.

▪ महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जाणार आहेत.

▪ ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येणार आहे.

▪ मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १० हजार प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येणार आहे. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित)

▪ निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत ६ महिन्यांचा करार केला जाणार असून हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

### मुख्यमंत्री योजनादूताच्या निवडीसाठी पात्रतेचे निकष :-

✻ वयोमर्यादा १८ ते ३५ वयोगटातील उमेदवार.
✻ शैक्षणिक अर्हता- कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर.
✻ संगणक ज्ञान आवश्यक.
✻ उमेदवाराकडे अदययावत मोबाईल असणे आवश्यक.
✻ उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असणे आवश्यक.
✻ उमेदवारांचे आधार कार्ड असावे व त्याच्या नावाचे बँक खाते आधार संलग्न असावे.

योजनादूत निवडीसाठी उमेदवाराने सादर करावयाची कागदपत्रे:-
✻ विहित नमुन्यातील मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज.
✻ आधार कार्ड.
✻ पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ.
✻ अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला)
✻ वैयक्तिक बँक खात्याचा तपशिल.
✻ पासपोर्ट आकाराचा फोटो.
✻ हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील)

### मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक प्रक्रिया:-

✻ उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या बाह्यसंस्थांमार्फत संपूर्णत: ऑनलाईनरित्या पूर्ण करण्यात येईल.
✻ ही छाननी नमूद केलेल्या पात्रतेच्या निकषानुसार करण्यात येईल.
✻ ऑनलाईनरित्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी राज्यातील प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल.
✻ जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने, प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील (यामध्ये उमेदवारांची शैक्षणिक व वयोमर्यादेविषयक मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील). त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर ६ महिन्याचा करार केला जाईल. कराराचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही.
✻ जिल्हा माहिती अधिकारी शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व निर्देशन करतील.
✻ जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, (कौशल्य विकास रोजगार) व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १/ शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून पाठवतील.

मुख्यमंत्री योजनादूत या कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना सोपविण्यात येणारे कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. सबब या नेमणूकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही, याबाबतचे हमीपत्र निवड झालेल्या उमेदवारांकडून घेण्यात येणार आहे.

### निवड झालेल्या योजनादूताने करावयाची कामे:

✻ योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील.
✻ प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.
✻ योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करताना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील.
✻ योजनादूत दर दिवशी त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल तयार करुन तो ऑनलाईन अपलोड करतील.
✻ योजनादूत त्यांना सोपविलेल्या जबाबदारीचा स्वतःच्या स्वार्थासाठी/नियमबाह्य कामासाठी उपयोग करणार नाहीत, तसेच ते गुन्हेगारी स्वरुपाचे/गैरवर्तन करणार नाहीत. योजनादूत तसे करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येवून त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल.
✻ योजनादूत अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

### उपसंचालक (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांची जबाबदारी:-

✻ विभागीय स्तरावर विभागीय संचालक / उपसंचालक (माहिती) या योजनेचे सनियंत्रण करतील.
✻ जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा विभागीय स्तरावर घेतला जाईल.
✻ जिल्हा माहिती अधिकारी हे या योजनेसाठी संबंधित जिल्हयाचे नोडल ऑफिसर असतील.
✻ संबंधित जिल्हयातील योजनादूतांनी विहित नमुन्यात ऑनलाईन अपलोड केलेल्या त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा आढावा जिल्हा माहिती अधिकारी घेतील तसेच, संबंधित योजनादूतांना त्यांच्या कामकाजामध्ये मार्गदर्शन करतील.

### माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील उपसंचालक (वृत्त) यांची नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी :-

✻ मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रमाशी संबंधित कामकाजाचे समन्वयन करतील,
✻ प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी / उपसंचालक यांच्याकडून दैनंदिन आढावा घेतील.
✻ प्रत्येक जिल्ह्याने मुख्यालयाला साप्ताहिक अहवाल पाठविल्यानंतर त्याचे विश्लेषण करतील.
✻ योजनादूत कार्यक्रमाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या बाह्यसंस्थेकडून अहवाल तयार करून घेतील. त्यानुसार राज्यातील कोणत्या जिल्ह्याचे काम समाधानकारक आहे अथवा नाही, हे तपासून त्याचा अहवाल तयार करतील.
✻ योजनादूतांची निवड, समुपदेशन व निर्देशन आणि उद्दिष्टाप्रमाणे कामकाज केल्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतील.
✻ योजनादूतांना त्यांचे मासिक मानधन विहित वेळेत अदा होते किंवा कसे याबाबत आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता आयुक्तालय यांच्याकडे समन्वय साधून खातरजमा करतील व याबाबत काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करतील.

### योजनादूत कार्यक्रमाच्या संचलनासाठी बाह्यसंस्थांमार्फत करावयाची कामे:-

✻ उमेदवारांची ऑनलाईन नोंदणी करणे.
✻ उमेदवारांच्या प्राप्त अर्जाची तसेच, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची छाननी करणे व पात्र उमेदवारांच्या नावांची यादी जिल्हा माहिती अधिकारी यांना ऑनलाईन उपलब्ध करुन देणे.
✻ निवडण्यात आलेले योजनादूत यांना जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने समुपदेशन व निर्देशन, कामकाजाचे वाटप इ. बाबतीत सनियंत्रण करणे.
✻ योजनादूतांना कामाचे वाटप झाल्यानंतर त्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबतचा (हजेरी) ऑनलाईन पद्धतीने अहवाल घेणे. मुख्यालय स्तरावरील उपसंचालक (वृत्त) (नोडल ऑफीसर) यांना याबाबत आवश्यक असेल तेव्हा माहिती देणे. तसेच, उपस्थितीबाबतचा व अन्य बाबींचा साप्ताहिक अहवाल त्यांना सादर करणे.
✻ योजनादूतांनी प्रत्येक दिवशी केलेल्या कामाचा ऑनलाईन अहवाल घेणे. त्यानंतर हा अहवाल जिल्हा माहिती अधिकारी व नोडल ऑफिसर, माहिती जनसंपर्क महासंचालनालय यांना पाठविणे.
✻ योजनादूतांच्या मानधनाची देयके तयार करुन जिल्हा माहिती अधिकारी यांना सादर करणे. त्याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय बाबी सादर करणे.

### मुख्यमंत्री योजनादूतांना दयावयाचे मानधन व त्याकरिता करावयाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीबाबत:-

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ५० हजार योजनादूतांकरिता प्रति महिना रुपये १० हजार याप्रमाणे ६ महिन्याकरीता अंदाजे रुपये ३०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. दि. ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे योजनादूतांच्या मानधनावरील खर्च कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत योजनादूतांची निवड, समुपदेशन व निर्देशन व त्यांनी उद्दिष्टाप्रमाणे कामकाज केल्याबाबत संपूर्ण खातरजमा करण्याची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची राहिल. तद्नंतरच योजनादूतांना मासिक मानधन अदा केले जाईल.

संबंधित उमेदवारांचे मानधन आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांच्यामार्फत दि.९ जुलै २०२४ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे त्वरीत अदा करण्यात येईल. ही कार्यवाही प्रत्येक महिन्याच्या २ तारखेपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८०७१८३२०८४८०७ असा आहे.

तरी जिल्हयातील होतकरु व गरजू पात्र उमेदवारांनी या योजनेचा जरुर लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून तसेच जिल्हा माहिती कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

**-मनोज शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी,
ठाणे

चालू वर्षाच्या मागणी बिलासह थकीत पाणी बिल भरणा करणाऱ्या

# नागरिकांना १०० टक्के सूट : आयुक्त सौरभ राव

ठाणे : महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळसंयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह पूर्ण भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट लागू करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी आज दिली. थकीत पाणीपट्टी बिलावर १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

सदर योजना दि.१ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट / सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

जे नागरिक दि.०१/०४/२०२५ आपली थकबाकीची रक्कम प्रलंबित ठेवणाऱ्या खातेदारांवर जप्ती कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन संबंधिताचे नळ संयोजन खंडीत करणे, मिटर रुम सिल करणे व पंप जप्ती अशी कारवाई होईल असे आयुक्त यांनी यावेळी नमूद केले. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावधी होणेसाठी प्रभाग समिती स्तरावर माहिती फलक लावण्यात यावेत व सदर योजना प्रभावीपणे राबवावी अशी सूचना आयुक्तांनी केली आहे. या योजनेचा लाभ जास्तीत नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी केले आहे.

सरस्वती शाळेतील शिक्षिकेला
निलंबित करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरु

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा प्रशासन सजग

ठाणे : नौपाडा येथील सरस्वती मंदिर ट्रस्ट शाळेत दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षिकेने मारल्याच्या प्रकरणावर शाळा प्रशासनाने शिक्षिकेला निलंबित केले आहे. आता, या शिक्षिकेवर निलंबनाची कायदेशीर प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे पालकांनी संयम बाळगावा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी तसेच त्यांच्या आरोग्यासाठी आम्ही सदैव सजग आहोत, अशी भूमीका शाळा प्रशासनाने स्पष्ट केली आहे.

नौपाडा येथील सरस्वती मंदिर ट्रस्ट शाळेत काही दिवसांपूर्वी दुसरीत शिकणारा विद्यार्थी शिक्षिकेने मारल्याने तणावात गेल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. या शिक्षिकेने विद्यार्थ्याच्या डोक्यात स्टीलच्या छडीने मारले होते. त्यामुळे विद्यार्थ्याच्या डोक्यात रक्तस्त्राव झाला. तसेच त्याने लिखाण केलेल्या वहीचे पान फाडून त्याला वर्गात लिखाण करुन दिले नाही. विद्यार्थी तणावात आल्याने मुलाच्या पालकांनी याप्रकरणी पंकजा राजे या शिक्षिकेविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तसेच या शिक्षिकेविरोधात इतर पालकांकडूनही अश्याच प्रकारच्या तक्रारी समोर आल्या. सर्व पालकांकडून आलेल्या तक्रारींनंतर संस्थेने त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला. शाळेच्या मुख्याध्यापक यांनी शानभाग यांना नोटीस देऊन चार दिवसांत खुलासा मागितला होता. यानंतर शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली आणि अहवाल शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर केला. त्यानंतर, ठाणे महापालिका शिक्षणाधिकारी यांनी शाळेला योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, २० ऑगस्ट रोजी सर्व संबंधित व्यक्तींच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत पालक, संस्थेचे विश्वस्त, पालक शिक्षक संघटना, मानसोपचारतज्ज्ञ, आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून शिक्षिका पंकजा शानभाग यांच्या संदर्भात योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी ग्वाही विश्वास्तांनी या बैठकीत दिली. संस्थेने शिक्षणाधिकारी यांच्याकडे या शिक्षिकेच्या निलंबनासाठी पूर्वपरवानगी मागितली होती, ज्यास २३ ऑगस्ट रोजी मान्यता देण्यात आली. त्यानुसार, या शिक्षिकेवर निलंबनाची कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती शाळा प्रशासनाकडून देण्यात आली.

# नवी मुंबईमध्ये रोजगाराच्या विपुल संधी : संदीप नाईक

**महारोजगार मेळाव्याचा ४५० उमेदवारांना लाभ** | **७०० पेक्षा अधिक उमेदवारांनी दिली महारोजगार मेळाव्याला भेट** | **बेलापूरमध्ये रोजगार इच्छुकांसाठी दैनंदिन मार्गदर्शन केंद्र, प्रत्येक नोडमध्ये होणार रोजगार मेळावा**

नवी मुंबई : संदीप नाईक प्रतिष्ठानच्या सौजन्याने आज सीबीडी-बेलापूर येथील वारकरी भावनात पार पडलेल्या दहाव्या मोफत महारोजगार मेळाव्याचा ४५० उमेदवारांना लाभ झाला असून १८० उमेदवारांची तात्काळ निवड करण्यात आली आहे. तर काहींच्या मुलाखती होवून त्यांची नोंदणी निवड प्रकीयेच्या पुढील टप्प्यासाठी करण्यात आली आहे. माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या हस्ते निवड झालेल्या उमेदवारांना तात्काळ नियुक्तपत्रांचे वाटप करण्यात आले. या महारोजगार मेळाव्यासाठी ७८ कंपन्यांनी नोंदणी केली होती.

### यांना मिळाली तात्काळ नोकरी

रोहित झिरमुटे, अथर्व भिंगार्डे, सुजल पतवा, भानु प्रताप सिंग, रवी जिल्हापूर, प्रियंका पवार, प्रणाली घोडके, सुरज जाधव, प्रीती पोटे, संकेत बडे.

### अवतरण.....

मी इंजिनियर आहे. नोकरीच्या शोधात होतो. संदीप नाईक प्रतिष्ठान आयोजित महारोजगार मेळाव्याला भेट दिली. पहिल्याच प्रयत्नात मला सिको एनालिटिक्स मध्ये नोकरी मिळाली.

-संकेत बडे, नेरूळ




महारोजगार मेळाव्यात बीपीओ, केपीओ, आयटी, फॅसिलिटी मॅनेजमेंट, फिनान्स, इन्शुरन्स, सिक्युरिटी, उत्पादन, टयुटोरियल्स, इंजिनिअरिंग, फूड, रिटेल, कम्प्युटर हार्डवेअर अॅन्ड नेटवर्कींग, हॉस्पिटल्स, सेल्स ऍन्ड मार्केटींग, हॉटेल इंडस्ट्री इत्यादी क्षेत्रातील ५० कंपन्यांचे स्टॉल लावण्यात आले होते. विविध आस्थापनांमध्ये ६३०० रोजगारांची संधी उपलब्ध होती. संदीप नाईक यांच्या हस्ते या महारोजगार मेळाव्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संदीप नाईक यांनी सांगितले की, नवी मुंबईमध्ये रोजगाराच्या विपुल संधी असून या संधी शहरातील उमेदवारांना कशा मिळतील यासाठी प्रयत्न करणार आहे. भविष्यात शहरातील प्रत्येक नोडमध्ये रोजगार मेळावे भरविण्यात येतील. बेलापूर सेक्टर १५ येथील भाजपा जनसंपर्क कार्यालयामध्ये रोजगारइच्छुक उमेदवारांसाठी दैनंदिन मार्गदर्शन केंद्र सुरू करणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

नवी मुंबईमध्ये मोठे औद्योगिक क्षेत्र आहे. नवी मुंबईला लागूनच पुढील एक दीड वर्षात आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित होणार आहे. केंद्र सरकारच्या वतीने डेटा सेंटर उद्योगांमध्ये मोठी गुंतवणूक करण्यासाठी नवी मुंबईची निवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे नवी मुंबईत मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. या संधी प्राप्त करून घेण्यासाठी तरुण आणि तरुणी यांनी जागरूक राहिलं पाहिजे. विविध उद्योगांमधून आणि आस्थापनांमधून पाहिजे असलेलं मनुष्यबळ आणि उपलब्ध मनुष्यबळ यांची सांगड घातली तर अनेकांना रोजगार प्राप्त होतील असा विश्वास संदीप नाईक यांनी व्यक्त केला. लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी कामगारांचे नेतृत्व म्हणून नवी मुंबईतील कारखान्यांमधून स्थानिकांना रोजगार कसा प्राप्त होईल याकरता अविरत परिश्रम घेतले. कामगार आणि कंपन्या दोन्ही जगल्या पाहिजेत, अशी समतोल भूमिका त्यांची होती. महारोजगार मेळाव्यांमधून त्यांचा हाच विचार पुढे नेला जातो आहे. रोजगार प्राप्तीसाठी प्रयत्न करण्याबरोबरच तरुण आणि तरुणींनी स्वयंरोजगार स्टार्टअप कडे देखील वळावे. त्यासाठी आवश्यक सर्व प्रकारचे सहकार्य आणि पाठबळ आपण देऊ, अशी ग्वाही संदीप नाईक यांनी दिली. बेलापूर येथील मार्गदर्शन केंद्रातून उमेदवारांना रोजगार मिळवण्यासाठी मुलाखतीची तयारी घेण्यापासून ते आवश्यक सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे अशी माहिती देऊन नवी मुंबईतील रोजगार इच्छुकांसाठी निरंतर महारोजगार मेळावे आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

मेळाव्यात सहभागी झालेल्या उमेदवारांना उद्योग जगतातील सुप्रसिद्ध तज्ञ संदीप दांडेकर यांनी मार्गदर्शन करताना अधिक चांगल्या प्रकारे उमेदवारांनी आपल्या कौशल्यांचा विकास करीत राहायला पाहिजे, असा सल्ला दिला. बदलांसोबत जातानाच इतरांपेक्षा आपण काय वेगळं देऊ शकतो याचा विचार करण्याचे आवाहन केले. संदीप नाईक यांचे नेतृत्व प्रेरणादायी असून लोककल्याणासाठी व्यापक आणि सूक्ष्म पातळीवर विचार करण्याची त्यांची क्षमता असल्याचे नमूद केले.

महारोजगार मेळाव्याप्रसंगी माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभागृहनेते रवींद्र इथापे, स्थायी समितीचे माजी सभापती डॉक्टर जयाजी नाथ, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी सभापती नेत्रा शिर्के, भाजपा महामंत्री सुरज पाटील, माजी नगरसेवक अशोक गुरखे, नवी मुंबई भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा माधुरी सुतार, युवा मोर्चाचे अध्यक्ष अमित मेढकर, उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष राजेश राय, विनीत पालकर, माजी नगरसेविका मीरा पाटील, राजश्री कातकरी, शिरीष म्हात्रे, माजी नगरसेवक सुरेश शेट्टी, माजी नगरसेविका शिल्पा कांबळी, माजी नगरसेवक विशाल डोळस, अशोक नरबागे, भाऊ भापकर, अमित मढवी, जगन्नाथ कोळी, दीपक जोशी, मोतीराम पालकर, राजेश ठाकूर, सुभाष गायकवाड, बाळकृष्ण बंदरे, चंद्रशेखर भोपी, गणेश कमळे, मनोहर बाविस्कर, सुरेश गायकवाड, आप्पा मुळे, प्राचार्य प्रताप महाडिक, माजी नगरसेवक बाळकृष्ण पाटील, दयाल आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर मोरे यांनी केले.



# बाळासाहेब ठाकरे चौपाटीच्या दुसऱ्या टप्प्याचे रविवारी लोकार्पण

**आ. प्रताप सरनाईक आणि पालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली पाहणी**

ठाणे (गणेश भोईटे) : केंद्र आणि राज्य सरकार, ठाणे महानगरपालिका, ठाणे स्मार्ट सिटी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने नागला बंदर खाडीलगत विकसित करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे चौपाटी, गायमुखच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण रविवार, ०१ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची शुक्रवारी आमदार प्रताप सरनाईक आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाहणी केली.

गायमुख येथे, स्मार्ट सिटीच्या कामांच्या अंतर्गत येथे सुमारे ८०० मीटरची लांबी असलेल्या या चौपाटीवर जेट्टी, गणेश विसर्जन घाट, दशक्रिया विधी घाट, खाडी लगत पादचाऱ्यांसाठी पदपथ, रस्त्यालगत पदपथ, मियावाकी उद्यान, आसनव्यवस्था, अम्फी थिएटर, वाहन पार्किंग व्यवस्था, प्रसाधनगृहे, विद्युत रोषणाई आणि सीसीटीव्ही आदी सुविधा करण्यात आल्या आहेत.

दशक्रिया विधी घाट येथे सध्या बांधण्यात आलेली शेड अपुरी आहे. ती मोठी असावी, अशी स्थानिक नागरिकांची मागणी असल्याचे यावेळी आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले. त्यानुसार, वाढीव शेड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी अधिकाऱ्यांना दिले.मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते रविवारी या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण होत आहे. त्यामुळे ठाणेकरांना फिरण्यासाठी, कौटुंबिक सहलीसाठी एक चांगली व्यवस्था तयार झाली आहे. मुंबई महानगर प्रदेशातील ही सगळ्यात मोठी चौपाटी ठरणार आहे. त्यानुसार, या चौपाटीचा विकास करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्त राव यांनी सांगितले. त्याचबरोबर, नागला बंदर येथेच आरमाराची प्रतिकृती साकारण्यात येणार असून हा नागला बंदर वॉटरफ्रंट डेव्हलपमेंटचा तिसरा टप्पा असेल. त्याचे भूमिपूजनही मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते होणार असल्याची माहितीही आयुक्त राव यांनी दिली.

- या पाहणी दौऱ्यात, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त दिनेश तायडे आणि मनोहर बोडके, सहाय्यक नगररचना संचालक संग्राम कानडे, उपनगर अभियंता विकास ढोले, शुभांगी केसवानी, सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, संजय कदम, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान आदी अधिकारी उपस्थित होते.
- त्यानंतर, नागला बंदर नाक्यानजिक होत असलेल्या सर्वधर्मीय स्मशानभूमीच्या जागेची तसेच, कासार वडवली येथील विविध समाज भवनांच्या इमारतीची पाहणीही आमदार प्रताप सरनाईक आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली.
- मुख्यमंत्री हे सर्वधर्मीय स्मशानभूमीच्या विषयाचा पाठपुरावा करीत आहेत. हे सर्वधर्मीयांचे स्मृती वन असेल. त्यात काही कारणाने विलंब झाला असला तरी आता हे काम मार्गी लागेल, असा विश्वास आमदार प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेअंतर्गत मिरा-भाईंदर पालिका आयुक्त यांची शहरातील सोसायट्यांना सदिच्छा भेट

मिरा भाईंदर शहर स्वच्छ आणि सुंदर होण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेची जागृती करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेला मिरा भाईंदर शहरातील सोसायटी, शाळा, हॉस्पिटल, हॉटेल्स, शासकीय कार्यालय, महाविद्यालय आणि मार्केट यांना मार्गदर्शन व स्टार रँकिंगबाबत संबोधित करण्यात आले. या स्पर्धेत विजयी स्पर्धकाला प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे. मा. आयुक्त यांनी MICL कॉम्प्लेक्स, स्कायलाईन कॉम्प्लेक्स आणि सृष्टी कॉम्प्लेक्स अशा तीन नागरी वसाहतींना सदिच्छा भेट देत कचरा विलगीकरण, कॉम्प्लेक्स परिसरातील स्वच्छता तसेच RRR सेंटर संबंधित नागरिकांना विशेष मार्गदर्शन केले आणि स्वच्छता स्टार रँकिंग दिलेल्या उल्लेखनीय प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त केले. यामध्ये आयुक्त




यांनी RRR center अंतर्गत Know your donation हा उपक्रम सोसायट्यांनी राबवुन मूल्यवान वस्तुंचे ऊेररींलेप गरजू व्यक्तिंना करावे असे आवाहन केले. स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेत घनकचरा वर्गीकरण, शौचालय व्यवस्थापन, परिसरातील स्वच्छता व इतर नाविन्यपूर्ण गोष्टीसाठी सर्व आस्थापनांना १ स्टार, ३ स्टार, ५ स्टार आणि ७ स्टार अशा प्रकारची स्टार रँकिंग देण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये १५३ शाळा, ८५ हॉटेल, २७० गृहनिर्माण संस्था, २८ हॉस्पिटल, १० शासकीय कार्यालय व १ मार्केट इतक्या आस्थापनांनी सहभाग नोंदवला आहे. यापुढेही मिरा-भाईंदर शहर प्रदूषण मुक्त तसेच आणखीन स्वच्छ आणि सुंदर कसे होईल याचा विचार करून जे जे उपक्रम महापालिकामार्फत राबविण्यात येतील त्या उपक्रमात असेच उत्कृष्ट सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले.

## दोन दलालांच्या हत्येप्रकरणी पाच जणांना अटक

नवी मुंबई : रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी मृतावस्थेत आढळलेल्या दोन दलालांच्या हत्येचा उलगडा झाला असून पोलिसांनी याप्रकरणी पाच जणांना अटक केली आहे. जमिनीच्या व्यवहारातून हा प्रकार घडल्याचे तपासात समोर आले असून यातील एक मृत दलाल सुमित जैन यानेच हा कट रचल्याचे समोर आले आहे. दुसऱ्या दलालाच्या हत्येनंतर सुपारीच्या पैशांवरून वाद झाल्याने जैन याचीही हत्या झाल्याचा पोलिसांचा संशय आहे.

विठ्ठल नाकाडे, जयसिंग ऊर्फ राजा मधु मुदलीयार, आनंद कुज, वीरेंद्र कदम, अंकुश सीतापुरे अशी या आरोपींची नावे असून त्यांना ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सुमित जैन आणि आमिर अन्वर खानजादा अशी हत्या झालेल्या दलालांची नावे आहेत. हे दोघेही २१ ऑगस्ट रोजी नेरुळ येथून बेपत्ता झाले होते. त्यापैकी सुमित याचा मृतदेह मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गालगत खोपोलीनजीक आढळला होता. मात्र खानजादा याचा थांगपत्ता लागत नव्हता. त्यामुळे नवी मुंबईचे पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, उपायुक्त अमित काळे, पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा आणि परिमंडळ एक पोलीस यांची एकूण आठ तपास पथके तयार करण्यात आली होती. मृत सुमित आणि आरोपी विठ्ठल यांनी पाली येथे एका मृत व्यक्तीच्या नावे असलेली साडेतीन एकर जमीन कागदपत्रांचे फेरफार करून बळकावली आणि तिचा व्यवहार केला.

# ठाण्यात यावर्षी गणेश मूर्ती विसर्जनासाठी फिरती व्यवस्थाही सज्ज

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रात यंदा गणेश मूर्ती विसर्जन करण्यासाठी सहा फिरत्या विसर्जन व्यवस्थांची व्यवस्था करण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या संकल्पनेतून ही व्यवस्था तयार झाली असून त्यात विसर्जनाची व्यवस्था असलेला ट्रक ठरलेल्या वेळी वेगवेगळ्या ठिकाणी फिरणार आहे. त्या ट्रकवरील टाकीत गणेश मूर्तींचे विसर्जन करता येणार आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, बांधकाम विभाग, पर्यावरण विभाग आणि घनकचरा विभाग यांनी विसर्जन व्यवस्थेचे नियोजन केले आहे. त्यात, ०९ विसर्जन घाट, १५ कृत्रिम तलाव, १० मूर्ती स्वीकृती केंद्र आणि ४९ ठिकाणी टाकी विसर्जन व्यवस्था आणि सहा फिरत्या विसर्जन व्यवस्था यांचा समावेश आहे.

फिरत्या विसर्जन व्यवस्थेमुळे नागरिकांना विसर्जनाची आणखी एक सुविधा उपलब्ध होणार आहे. ठाण्यातील गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक असावा यासाठी महापालिकेचे प्रयत्न आहेत. त्याला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तसाच तो या फिरत्या व्यवस्थेलाही मिळेल, असा विश्वास आयुक्त राव यांनी व्यक्त केला आहे.

यावर्षी, ०८ (दीड दिवस), १२ (सहा दिवस) आणि १४ सप्टेंबर (१० दिवस) अशा तीन दिवशी ही फिरती विसर्जन व्यवस्था नोपाडा-कोपरी, माजिवडा-मानपाडा, वागळे आणि वर्तकनगर या चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपलब्ध असेल. सकाळी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाग समितीमधील विविध ठिकाणी ठराविक काळासाठी हे फिरते वाहन विसर्जन व्यवस्थेसह उपलब्ध राहील. त्यावरील टाकीमध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करता येईल. या विसर्जन व्यवस्थेचे वेळापत्रक ठाणे महापालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येईल, अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणाची साथ धरून पत्रकार सृष्टीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारे वृत्तपत्र छायाचित्रकार अशोक घाग यांचा सत्कार विटावा येथील ओम साई क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष हेमंत भोईर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना. (छाया : अशोक घाग)



# चित्रकला समाज जागृतीचे प्रभावी माध्यम : संदीप नाईक

**संदीप नाईक प्रतिष्ठानच्या सौजन्याने पार पडलेल्या भव्य चित्रकला स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न, लावण्या चव्हाण, सुकन्या चक्रवर्ती, पियुष सोनावणे प्रथम विजेते**






नवी मुंबई : संदीप नाईक प्रतिष्ठानच्या सौजन्याने पार पडलेल्या भव्य चित्रकला स्पर्धेचा आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात बक्षीस समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि कलाप्रेमी नागरिकांनी खचाखच भरलेल्या सभागृहात या पारितोषिक वितरण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले. याप्रसंगी माजी महापौर जयवंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी सभापती संपत शेवाळे, माजी सभापती शुभांगी पाटील, भाजपा महामंत्री सुरज पाटील, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष अमित मेढकर, माजी नगरसेवक प्रकाश मोरे, माजी नगरसेविका अंजली वाळुंज, समाजसेवक विजय वाळुंज त्यांच्यासह लोकप्रतिनिधी, भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलात्मकतेला मोठे व्यासपीठ निर्माण करून देणाऱ्या या स्पर्धेमध्ये ६० शाळांमधील पाच हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही स्पर्धा इयत्ता पाचवी ते सातवी, इयत्ता आठवी ते दहावी आणि महाविद्यालयीन गट अशा तीन गटांमध्ये घेण्यात आली. भारतीय सण उत्सव, स्वच्छ भारत अभियान नवी मुंबई, माझे आवडते उद्यान, नवी मुंबईतील आगरी कोळी संस्कृती, नवी मुंबईतील एक प्रेक्षणीय स्थळ, भारतीय सण उत्सव, नवी मुंबईतील जैवविविधता, नवी मुंबई मेट्रो आणि नवी मुंबईचे पर्यावरण संवर्धन असे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम तसेच चषक बक्षीस स्वरूपात देण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर सहभागी शाळांचा देखील सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी आपले विचार मांडताना संदीप नाईक म्हणाले, चित्रकला हे समाज जागृतीचे प्रभावी माध्यम आहे. चित्रांमधून विद्यार्थ्यांचे विचार, कलात्मकता आणि सर्जनशीलता याबरोबरच भूमिकाही व्यक्त होत असते. स्पर्धेमध्ये दिलेल्या विषयातून नवी मुंबईचा विकास, स्वच्छता, पर्यावरण आदी मुद्द्यांशी विद्यार्थी जोडले गेले. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शहराविषयी आपुलकी आणि देशाविषयी कर्तव्यभाव निर्माण करण्याचा हेतू होता. केवळ निवडणुका आल्या म्हणजे सामाजिक उपक्रम राबवायचे असे नाही तर लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी आम्हाला सामाजिकतेची शिकवण दिली असून गेली ३२ वर्षे या विचारानुसार कला, क्रीडा, सामाजिक उपक्रम निरंतर राबवित आहोत असे नमूद करून संदीप नाईक यांनी आनंदी जीवन जगण्यासाठी प्रत्येकाने एक तरी छंद जोपासावा, असे आवाहन केले. या स्पर्धेचे परीक्षण कलाशिक्षक विलास देवरे आणि कलाशिक्षक राजाराम अहिरराव यांनी उत्तम प्रकारे केले.

कलाशिक्षक देवरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संदीप नाईक यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कलेचे मोठे व्यासपीठ निर्माण करून दिल्याचे सांगितले. नवी मुंबई विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोज गुरव यांनी कला महोत्सव, क्रीडा महोत्सव, सराव परीक्षा इत्यादी उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास संदीप नाईक यांनी साधल्याचे म्हटले. तर भारती विद्यापीठाचे कलाशिक्षक लोहार सर यांनी संदीप नाईक हे नवी मुंबईचे भावी कलाकार घडवीत असल्याचे गौरव उद्गार काढले.

याप्रसंगी माजी महापौर जयवंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी सभापती संपत शेवाळे, माजी सभापती शुभांगी पाटील, भाजपा महामंत्री सुरज पाटील, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष अमित मेढकर, माजी नगरसेवक प्रकाश मोरे, माजी नगरसेविका अंजली वाळुंज, समाजसेवक विजय वाळुंज, समाजसेवक सुरेश शिंदे, गणेश भगत, भाऊ भापकर, जगन्नाथ कोळी, सुनील सुतार, माजी नगरसेवक शशिकांत भोईर, मुकेश पष्टे सर, बाळकृष्ण बंदरे, दीप्ती कोळी, सुनील कुरकुटे, अक्षय पाटील, माजी नगरसेवक सुनील पाटील, उर्मिला शिंदे, महाजन सर, संतोष शेट्टी, अक्षय नकाते, वृषाली बापट, माजी नगरसेविका शिल्पा कांबळी, सुदत्त दिवे, राजेश ठाकूर, सुभाष गायकवाड, नरेंद्र म्हात्रे, प्राचार्य प्रताप महाडिक, सुधीर थळे सर त्यांच्यासह लोकप्रतिनिधी, भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर मोरे यांनी केले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१